# ।। ॐ श्री साईराम।।

# प्रशांती संदेश – ८४

प्रशांती संदेशच्या ८४ व्या भागात तुमचे स्वागत असो. तुम्ही इतका वेळ दिलात त्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे, तसेच मला आशा आहे की भविष्यातही तुमचे कुतुहल कायम राहील. तुमच्यावर आणि तुमच्या कुटुंबावर भगवानांची कृपा राहो!

आजचा विषय आहे 'दोन नियंत्रणे.' दुसऱ्या शब्दात सांगायचे तर आपण दोघांच्या नियंत्रणात आहोत. ते काय आहेत? कोण आहेत? ते आपणा सर्वांवर नियंत्रण कसे ठेवतात? आपण त्यांना आपल्यावर नियंत्रण ठेवण्याची परवानगी कशी देतो? त्या प्रत्येकाचा परिणाम काय आहे? ते नियंत्रण ठेवणारे दोन कोण आहेत? आपण काही वेळ या विषयाची चर्चा करू या.

अगदी सरळ सांगायचे तर आपण ज्या दोन गोष्टींच्या नियंत्रणात आहोत ते एक म्हणजे मन आणि दुसरे हृदय. आपण सर्व मन आणि हृदय या दोन्हीच्या नियंत्रणात असतो. एक म्हणजे मन, जे आपले बाह्य जीवन, आपली दिनचर्या नियंत्रण करते आणि दुसरे, हृदय, जे आपले अंतर्विश्व, अंतर्क्षेत्र, आनंदाचे राज्य नियंत्रण करते. त्यामुळे आपण या दोन पैलूंचा विचार करू या. बाह्य पैलू जो मनाने नियंत्रित असतो आणि अंतर्पैलू, जो आपल्या हृदयाच्या नियंत्रणात असतो. या प्रत्येकाचा अभ्यास करू या.

मन हे नेहमी भेद करते, फरक करते, विभाजित, तुलना, स्पर्धा करते. हा मनाचा स्वभाव आहे. मन हे आपल्या सर्वांसाठी उपयुक्त असते, आपल्या बुद्धीच्या वाढीसाठी, बुद्धीमान होण्यासाठी. वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर, चांगले वाईट असे किंवा वर्ण, जात, पंथ, धर्म इ. मनाचे भेद असतात. त्यामुळे हे भेद बुद्धीशी संबंधित असतात आणि ते मनाच्या कार्यक्षेत्रात येतात. ही बुद्धी नंतर ठरवून, आपल्याला मार्गदर्शन करते, सांगत राहते, ''अंधश्रद्धा ठेवू नकोस. कधीही नको. कशाच्या तरी आधारावर निवाडा असावा.'' तरच तू तुझ्या श्रद्धेवर ठाम राहशील, नाहीतर जर तुझे कारणच न्याय देणारे नसेल तर ती अंधश्रद्धा होईल. हा बुद्धीचा खेळ आहे.

आणि मन हे नेहमी वस्तुस्थितीच्या दिशेने जाते. वस्तुस्थितीच्या आधारावर ते निवाडा करते आणि शिवाय आपल्याला आपल्या तर्कांचा, तर्कशास्त्राचा, तर्कसंगतीचा गर्व असतो आणि ते सर्व वस्तुस्थिती आणि आकडेवारीशी संबंधित असते. पुन्हा याचा संबंध मनाशीच येतो, म्हणून जे मनाचा काटेकोरपणे विचार करतात, त्यांनी इतर कशावर विश्वास करू नये कारण त्यांना सर्व काही वाजवी, तर्कसंगत, वैज्ञानिक आणि तांत्रिक हवे असते. त्यांच्या तर्कशास्त्राला ते आवाहन करणारे हवे.

म्हणूनच, मनाचे वर्चस्व राहते, मन या भागाचे नियंत्रण करते. पण गंमत अशी आहे की प्रेमाच्या बाबतीत मनाची भूमिका शून्य असते. बुद्धीवादी माणसाला अथवा मनाला प्रेमाची कल्पना नसते. का बरे? थोर शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटनविषयी असे म्हणतात की त्याची लग्नघटिका तो विसरून गेला होता. जेव्हा त्याची नववधू त्याला शोधायला प्रयोगशाळेत धावत गेली, तेव्हा त्याला आठवले की आपली लग्नघटिका निघून चालली आहे आणि वधू आपली वाट पाहत आहे.

अशीच एक महान जर्मन व्यक्ती, इमॅन्यूएल कांट, एक स्त्री त्यांच्या प्रेमात पडली आणि तिला त्यांच्याशी लग्न करायचे होते. या सत्पुरुषाने म्हटले, ''मला थोडा वेळ दे. काही ठरवण्यापूर्वी अभ्यास करू दे. परीक्षण करू दे, चौकशी करू दे.'' त्याने विवाहाच्या बाजूने तसेच विवाहाविरोधात पानेच्या पाने लिहून काढली. परिणाम काय झाला? तो काहीच निर्णय घेऊ शकला नाही. त्याचे मन काहीच निर्णय घेऊ शकले नाही कारण मनाला प्रेमाचे ज्ञान नाही. मग काय झाले? शेवटी ज्या मुलीला त्याच्याशी लग्न करायचे होते, तिला तो भेटायला गेला, परंतु खूप उशीर झाला होता. कारण तोपर्यंत लग्न करून तिला तीन मुलेही झाली होती. तो काळाच्या इतका मागे

होता याचे कारण असे की त्याला वाटले की प्रेम करणे, अथवा लग्न करणे वा न करणे हे मनाने ठरवावे.

म्हणून बहुतांश बुद्धीवादी लोक म्हणतात की प्रेम आंधळं असतं आणि प्रेमासाठी काही कारण असावे लागत नाही. पण या गोष्टी मला मोकळेपणाने व्यक्त करू द्या. आपण आपल्या मनाला जीवनाचा नेता होऊ देण्याची परवानगी देऊ नये. आपण आपल्या तर्कशास्त्राला हावी होऊ देऊ नये. कदापि नाही. आणि कदाचित मन आपल्याला समाजात कणखर होण्यास मदत करू शकते आणि आपण कणखर असलो तरीही खूप कमी आनंदी असू शकतो. मन आपल्याला संपत्ती मिळवण्यास मदत करेल. त्यामुळे आपण संपत्ती कमावतो. त्यात शंका नाही! तथापि, अंतर्यामी आपण खूप दरिद्री असतो.

मन आपल्याला कित्येक लोकांवर अनुशासन करण्यासाठी प्रोत्साहन करेल, मार्गदर्शन करेल. होय, आपण अनेकांवर प्रमुख म्हणून वर्चस्व दाखवू शकतो, पण अंतर्यामी गुलामच राहतो. मन कदाचित आपले जीवन प्रतिष्ठित बनवेल. तथापि खोलवर अंतरात आपण प्रतिष्ठित नाही. मन कदाचित आपल्याला जीवनात खूप हुशार, लबाड बनवेल. तथापि पूर्णत: मन:शांती मिळत नाही. हा सर्व मनाचा खेळ, तर्कावर अवलंबून आहे, आणि त्याला लगेच परिणाम हवे असतात. ही सर्व मनाची वैशिष्ट्ये आहेत, जी सर्वसाधारणपणे आपले जीवन नियंत्रित करतात.

आपण दुसऱ्या दिशेने पण विचार करूया. आपण आपल्या हृदयाच्या, अंतर्जगाच्याही नियंत्रणात असतो. हृदयाला काही कोणता भेदाभेद नसतो. तुम्हाला स्वामींचे सर्वांवरील प्रेम माहीतच आहे. लहान मुलाला बघितले की आपल्या मनात प्रेम जागृत होते आणि त्याचा हसरा चेहरा पाहून आपण आनंदी होतो. तो कुठल्या समाजाचा, जातीचा अथवा त्याची प्रतिष्ठा इ. चा आपण विचारही करत नाही. काहीच नाही. हृदयाला हे सर्व भेद ठाऊक नाहीत, आणि असेही हृदयाचा विचारांशी काही संबंध नाही. जराही नाही. याचे कारण असे की विचार हे बाह्यरूप आहे, परंतु हृदय हे भावनांनी, अंतर्यामीच्या भावनांनी युक्त असे आहे आणि या भावनांचा निवाडा अथवा बौद्धिक अंदाजांशी काही संबंध नाही. म्हणजेच काय की बुद्धीचा भावनांशी काही संबंध नाही आणि तसेही हृदय तर्कांचा विचार करीत नाही. तसेच, विश्वास ठेवण्यासाठी त्याला आधार लागत नाही. मुळीच नाही! तथ्यांची आवश्यकता नाही. आपली भक्ती दृढ होते, ती पूर्णपणे विनातर्क, निराधार असते, कारण आपल्या हृदयातून भावना निर्माण होतात.

भक्ती न्याय्य असावी लागत नाही. भक्ती ही प्रयोगशाळेत अथवा टेस्ट ट्यूबमधून सिद्ध करावी लागत नाही. हृदयातील भावभावना ह्या तर्क, तर्कशास्त्र, तर्कसंगतीच्या पलीकडे असतात. म्हणूनच, भावना सिद्ध करम शकत नाही. त्यामुळे हृदयाच्या कार्यक्षेत्राचा तर्कसंगतीशी विचार करणे मूर्खपणाचे ठरेल. त्यामुळे सर्वसामान्य जीवनासाठी तर्कसंगतीची गरज नाही.

मन फक्त पदार्थ, भौतिक जगाचा विचार करते. तथापि, कवी त्याच्या भावनांनी निर्माण होत असतो. वादक त्याच्या भावनांनी तयार होतो. एक नर्तक, त्याच्या भावनांनी जन्म घेतो. हृदय आणि त्याच्या भावनांमुळे परमानंद मिळतो. केवळ विचार तुम्हाला हर्षभरित करीत नलाही. नाही! तर केवळ हृदयातून उठणाऱ्या भावलहरींमुळेच हर्षोन्माद होतो.

मग काय होतं? आपण शांततेचा आनंद घेतो. शांतीची अनुभूती होते. भगवंताचा आस्वाद घेतो. हा भावनांचा प्रभाव असतो. हृदयातील भावना आपल्याला परमानंद काय आहे हे जाणून घेण्यास मदत करतात. परमानंद ही काही अवस्था नव्हे, कारण ती काही विशिष्ट गोष्टीमुळे आली असे नसते. इतर अवस्था मनाशी निगडीत असतात, त्याचा कशाशीही संबंध जोडला जातो तथापि, परमानंदाचे तसे नाही. ते या सर्वांच्या पलीकडे आहे.

हृदयाच्या भावनांचे काही मोजमाप केले जात नाही. त्याचे मोजमाप होऊच शकत नाही. ही एक अतिशय

महत्त्वाची बाब आहे, कारण मन हे हिशोबी आहे. मनाला ताबडतोब परिणाम हवे असतात. होय! 'काय बरे होईल? मला काय प्राप्त होईल? मला काय मिळाले? कधी मिळेल बरं मला?' सदा घाई व चिंता.

परंतु, हृदय व भावना अगदी अनिश्चित काळासाठीही प्रतीक्षा करू शकतात आणि त्या शोधक हृदयाची प्रतीक्षा म्हणजेच प्रार्थना. त्या प्रतिष्ठेमध्ये त्याला आनंद मिळतो, जो मनाला प्रतीक्षेत मिळत नाही. प्रतीक्षेत मन अस्वस्थ, क्षीण होते.

तथापि, हृदयाच्या भावनांना प्रतीक्षेत आनंद मिळतो. होय! आणि आपली श्रद्धा, प्रतीक्षाही करू शकते. आपली स्वामींच्या प्रती श्रद्धा इतकी दृढ आहे की आपण कितीही वेळ प्रतीक्षा करू शकतो. असे कित्येक भक्त आहेत जे स्वामींच्या एका दर्शनासाठी, अथवा इंटरव्ह्यू मिळण्यासाठी कित्येक आठवडे, महिने प्रतीक्षा करीत होते. होय! परंतु जरी ते वाट पाहत होते, तरी ते कंटाळले नाहीत. ते थकले नाहीत कारण त्यांची हृदये प्रेमाने ओतप्रोत होती. ते प्रेमाने, श्रद्धेने, विश्वासाने परिपूर्ण होते. त्यामुळे त्यांना कसली घाई नव्हती. ते थांबू शकत होते.

त्याचप्रमाणे, असेही कित्येक भक्त आहेत जे स्वामींच्या सकाळच्या दर्शनाला स्वामी येण्याची वाट पाहत. त्या प्रतीक्षाकाळात काही जण ध्यान करीत, काही शांतपणे जप करीत बसत. कित्येकजण स्वामींची पुस्तकं वाचत बसत. यामुळे वाट बघत बसणे कंटाळवाणे होत नाही. प्रतीक्षा त्रासदायक न होता, ती एक आध्यात्मिक साधना होते.

मग आपण त्या काळात स्वत:शीच गात बसू शकतो. याचाच अर्थ प्रतीक्षा साधना बनते. हे सर्व आपल्या हृदयातील भावभावनांवर निर्भर असते. जेव्हा सगळं म्हटल्याप्रमाणे घडतं तेव्हा त्याच्या पूर्णत्वाचा आपण आनंद घ्यावा. 'मी फक्त ५०% आनंदी आहे' असे आपण म्हणू शकत नाही. नक्कीच नाही! आनंद हा १००% असावा. असा परिपूर्ण आनंद असेल तर ती तुमची प्रतीक्षा नसेल कारण तुम्ही आधीच आनंदमय आहात.

त्यावेळी स्वामी तुमच्या समीप असतात कारण तुम्ही चिकाटीने, अत्यंत आनंदाने वाट पाहिलीत आणि स्वामींच्या दर्शनात ती सोशिकता महत्त्वपूर्ण असते. शिर्डी साईबाबा पण नेहमी म्हणतात, 'श्रद्धा आणि सबुरी.' म्हणजेच ही प्रतीक्षा आनंददायी, हर्षपूर्ण होते. ती साधनेत रुपांतरित होते. त्यात दिव्यत्वाचा अतिशय सुंदर अनुभव मिळतो! तुम्ही स्वत:ला तयार करीत असेपर्यंत प्रभू साक्षात समोर येतात. आपण तयारीत असल्याने दिव्यत्वाचा आपण अनुभव घेऊ शकतो. परमेश्वर तुम्हाला शोधत असतो.

जेव्हा स्वामी रांगेतून चालत असतात, तेव्हा ते काहींना इंटरव्ह्यूसाठी निवडतात. काहींच्या समोर पादनमस्कारासाठी उभे राहतात. काहींवर दृष्टिक्षेप टाकतात. त्यांचे दृष्टिक्षेप, त्यांचे हावभाव, त्यांचे पादनमस्कार अथवा इंटरव्ह्यू तसेच पत्रे घेणे हे सर्व म्हणजे परमेश्वर तुम्हाला शोधत येणे, तुमच्या समीप येणे होय.

ही खरोखरीच दिव्य घटना आहे आणि आपल्या सोशिकतेने केलेल्या प्रतीक्षेचे फळ आहे याचे परिवर्तन कशात होते, तर आत्मज्ञानाच्या अवस्थेत. आत्मज्ञानाची अवस्था. ती काय असते? आत्मज्ञान ही एक मर्यादेची अवस्था आहे. मर्यादा म्हणजे तुम्ही कशाला चांगले अथवा वाईट मानत नाही, कारण तुम्ही चांगले आणि वाईटच्या पलीकडे असता. चूक झाली तर कोणाला दोष देत नाही, अथवा बरोबर झाले म्हणून पाठ थोपटत नाही. बिलकुल नाही. कारण तुम्ही चूक-बरोबर, चांगले-वाईट, जय-पराजय, नफा-तोटा याच्यापलीकडे गेला आहात.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर आत्मज्ञान हे अद्वैत आहे. हा एक अद्वैताचा अनुभव होय. तुमच्या आत्मज्ञानात, तुमचा ज्ञान अथवा निरागसतेशी संबंध येत नाही. त्याचा काही संबंध नाही. कारण मी पूर्वीच म्हटले की हे अलौकिक आहे. ह्या आत्मज्ञानाच्या अवस्थेत, आत्मज्ञानाच्या प्रक्रियेत आपण जोखीम पत्करण्यास तयार असतो. याचे कारण असे की आपण मनाचे वर्चस्व, आज्ञा अनुभवतो, तेव्हा त्याची जोखीम घेण्याची तयारी

नसते.

परंतु, आत्मज्ञान प्राप्त करायचे असेल तर आपल्याला अनेक जोखीम पेलण्याची तयारी ठेवायला हवी. याचा अर्थ असा की कितीही काळ आनंदाने वाट पाहायची तयारी ठेवायला हवी, हे लक्षात असू द्या. सेवेसाठी तत्पर असायला हवे. सतत भगवानांच्या विचारात मग्न असायला हवे, 'सतत एकलक्ष्यी जागरुकता. तेच आपणास आत्मज्ञानाप्रत घेऊन जाईल.

म्हणूनच, आजचा विषय 'दोन नियंत्रण.' एक नियंत्रक 'मन', जे बाह्य परिणाम नियंत्रण करते, दुसरे नियंत्रक आपले हृदय.

आभारी आहे. साईराम.

परत भेटू या.

***